महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक DAHD-१२०२४/७३/२०२६-AH२ (१६९६७८५)
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२
दिनांक :- १६ जुलै, २०२६

वाचा :-
1) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम (सुधारणा), २०२३
2) Minimum Standards for Higher Agricultural Education (MSHAE) of Indian Council of Agricultural Research, New Delhi
3) MAFSU Regulations for Affiliation of Private Institutions Offering Degree in Veterinary/Dairy Technology/ Fishery Sciences, २०२४
4) कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे क्र. MAFSU/ DV/ F.No.२८१/७८१/२०२५, दिनांक २८/०७/२०२५
5) कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे जा.क्र. मपमविवि /पविशा/सशाअ(२४) /नस्ती क्र. २८१/४५९/२६, दि. ०३/०६/२०२६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम (सुधारणा), २०२३ मधील कलम ३५ (अ) मध्ये कायमस्वरुपी विनाअनुदानीत तत्वावर पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञांनामधील पदव्यांसाठी शिक्षण व संशोधनाची साधने पुरविण्याच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय म्हणुन संलग्नता देण्याची तरतुद आहे. तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम (सुधारणा), २०२३ मधील कलम ३० मध्ये पोट कलम (२) मधील खंड (आठ-अ) अन्वये महाविद्यालयांना संलग्नता व संस्थांना मान्यता देण्यासाठी विनियम करण्याचे अधिकार विद्यापीठास प्रदान करण्यात आले आहेत. सदर अधिकारास अनुसरुन विद्यापीठाने MAFSU Regulations for Affiliation of Private Institutions Offering Degree in Veterinary / Dairy Technology/ Fishery Sciences, २०२४ प्रसिध्द केली आहे.

२. उक्त महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नियमावली/ विनियम २०२४ मध्ये प्रत्येक महसुल विभागात एक पशुवैद्यकीय/दुग्ध तंत्रज्ञान/मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांचे महाविद्यालय कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याची तरतूद आहे. त्यानुसार विद्यापीठाने दि. १०.१२.२०२४ रोजी दुग्ध तंत्रज्ञान अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेशाच्या अनुषंगाने खाजगी संस्थाकडुन कायमस्वरूपी विनाअनुदानीत तत्वावर तात्पुरते संलग्नतेकरिता अर्ज मागविण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. सदर जाहिरातीव्दारे प्राप्त झालेल्या अर्जांची विद्यापीठाद्वारे छाननी/ तपासणी करून व विद्यापीठाच्या विद्या परिषद व कार्यकारी परिषदेच्या शिफारशीनुसार पुढील ०३ पात्र संस्थांना शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ पासून कायमस्वरुपी विनाअनुदानीत तत्वावर दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु करण्यास आणि विद्यार्थी प्रवेशास मान्यता देण्याची विनंती दिनांक ०३/०६/२०२६ रोजी पत्रान्वये विद्यापीठाने केली आहे.

क्र	विभाग	संस्थेचे नाव
१	अमरावती	स्व. मदनलालजी किसनलालजी संचेती सेवा समिती, मलकापुर, जि. बुलढाणा
२	छत्रपती संभाजीनगर	महात्मा गांधी मिशन ट्रस्ट, गांधेली, जि. छत्रपती संभाजीनगर
३		आदित्य एज्युकेशन ट्रस्ट, तराफ बोबडे, जि. बीड

३. उपरोक्त प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या मान्यतेसाठी सादर केला असता, मा. मुख्यमंत्री महोदय यांनी अमरावती विभागात स्व. मदनलालजी किसनलालजी संचेती सेवा समिती, मलकापुर, जि. बुलढाणा आणि छत्रपती संभाजीनगर विभागात महात्मा गांधी मिशन ट्रस्ट, गांधेली, जि. छत्रपती संभाजीनगर आणि आदित्य एज्युकेशन ट्रस्ट, तराफ बोबडे, जि.बीड येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून कायमस्वरुपी विनाअनुदानीत तत्वावर तात्पुरते संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार उक्त संस्थाना कायमस्वरुपी विना अनुदानित तत्वावर तात्पुरते संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

५. विद्यापीठाने वाचा क्र. ५ येथील दि. ०३/०६/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर संस्थांना सन २०२६-२७ च्या प्रथम वर्षाच्या ४० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरिता (५०टक्के शासकीय व ५० टक्के व्यवस्थापन) कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर तात्पुरते संलग्नीत दुग्ध महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता देण्याचा सादर केलेला प्रस्ताव विचारात घेवून, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावर तात्पुरते संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सुरु करण्यास पुढील संस्थांना नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

क्र	विभाग	संस्थेचे नाव	महाविद्यालयाचे नांव
१	अमरावती	स्व. मदनलालजी किसनलालजी संचेती सेवा समिती, मलकापुर, जि. बुलढाणा	स्व. शक्तिकुमार संचेती दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, मलकापुर, जि. बुलढाणा
२	छत्रपती संभाजीनगर	महात्मा गांधी मिशन ट्रस्ट, गांधेली, जि. छत्रपती संभाजीनगर	प्रा. प्रतापराव बोराडे दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली, जि. छत्रपती संभाजीनगर
३		आदित्य एज्युकेशन ट्रस्ट, तराफ बोबडे, जि. बीड	आदित्य दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, तराफ बोबडे, जि. बीड

अटी व शर्ती :-

१. सदर मान्यता ही कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर तात्पूरत्या संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाकरीता राहील.
२. सदर महाविद्यालयांना भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर यांनी वेळोवेळी विहीत केलेल्या मानकांची, विनियमांची व नियमांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

३. सदर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठामार्फत व राज्य शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार करण्यात येतील. सदर महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देवू नयेत.

४. दुग्धतंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमांची विविध शुल्कांची निश्चिती, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या प्राधिकरणामार्फत विहीत करण्यात येईल.

५. विद्यार्थी प्रवेश, शिक्षण व परिक्षा विषयक कार्यप्रणाली यांचे संनियत्रंण करण्याचे अधिकार, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना राहतील. तसेच, राज्य शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली मार्गदर्शक तत्त्वे व निकष सदर व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमासाठी लागू राहतील.

६. उपरोक्त नमुद तात्पूरते संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयांची संलग्नता, तपासणी व मूल्यांकनासाठी, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, राज्य शासन व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचे मार्फत वेळोवेळी निश्चित केलेले निकष व मार्गदर्शक तत्त्वे बंधनकारक असतील.

७. उपरोक्त नमुद तात्पूरते संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय सुरू करण्यासाठी तात्पुरते संलग्नता शुल्क/ बँक गॅरंटी/वार्षिक प्रशासकीय शुल्क व विद्यापीठ प्रवेश शुल्क जमा करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहतील.

८. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम (सुधारणा), २०२३ कलम ३७ अ नुसार आवश्यकते प्रमाणे खाजगी संस्थेची मान्यता प्राप्त तात्पूरते संलग्न महाविद्यालयांची मान्यता रदद करण्याबाबत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आवश्यक कार्यवाही करील.

९. उपरोक्त नमुद तात्पूरते संलग्न दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय यांना त्यांच्या सुचना फलक, पत्रव्यवहाराचे दस्ताऐवज, मालमत्ता, इ. वर "with Annual Provisional Affiliation of MAFSU" असे नमुद करावे.

१०. सदर महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व वेतनेत्तर दायित्व शासनावर असणार नाही.

११. उपरोक्त तात्पुरते संलग्नीत दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालये कायम स्वरूपी विना अनुदानित तत्वावर सुरू करावयाचे असल्यामुळे सदर महाविद्यालय/ संस्थेने विद्यापीठ/शासनाकडे कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत, असे हमीपत्र रु ५००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर सादर करावे.

१२. महाविद्यालयामध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करतांना The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ मधील तरतुदीनुसार तसेच या संदर्भातील वेळोवेळी विहित केलेल्या निकषानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता सोयी-सुविधा निर्माण करण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

१३. उपरोक्त नमुद तात्पूरते संलग्न दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय माहिती अधिकार अधिनियम-२०२६ नुसार कार्यवाही करण्यास बांधिल राहतील.

१४. दुग्ध तंत्रज्ञान पदवी प्रदान करण्याकरिता प्रचलित महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ शैक्षणिक नियमावली लागु राहील.

१५. पुढील शैक्षणिक वर्षाच्या तात्पुरत्या संलग्नतेची प्रक्रिया महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ विनियम-२०२४ च्या प्रावधानानुसार करण्यात येईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७१६११०७३१८२४५ असा आहे. हा आदेश डिजीजल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.07.16 11:11:04 +05'30'

(नि.भा. मराळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. कुलगुरु/ कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
५. सचिव (पदुम) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. स्व. मदनलालजी किसनलालजी संचेती सेवा समिती, मलकापुर, जि. बुलढाणा यांना कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेमार्फत
७. महात्मा गांधी मिशन ट्रस्ट, गांधेली, जि. छत्रपती संभाजीनगर यांना कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेमार्फत
८. आदित्य एज्युकेशन ट्रस्ट, तराफ बोबडे, जि. बीड, यांना कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेमार्फत
९. निवडनस्ती (कार्यासन पदुम-२), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.